- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे


**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-


**Hotel Mai VilLa**
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075



Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, १ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २६२ | किंमत : २ रूपये



**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# किनवट तालुक्यात अपघात, ४ ठार

## ६ जण गंभीर जखमी, सर्व भाविक तेलंगणातील

**वृत्तसंस्था, नांदेड**
मराठवाड्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या सहस्त्रकुंड धबधबा येथे महादेवाचे दर्शन घेऊन तेलंगणाकडे परतणाऱ्या भाविकांच्या कमांडर जीपला किनवट तालुक्यात भीषण अपघात झाला. तोटंबा घाटात भरधाव जीप रस्त्यालगतच्या झाडावर आदळून चौघांचा मृत्यू झाला असून ६ जण गंभीर जखमी झाले आहेत. ही दुर्घटना सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ च्या सुमारास घडली. यामुळे हळहळ व्यक्त होत आहे.




श्रावण मासानिमित्त तेलंगणातील कुबीर मंडळातील पारडी (बी) येथील रहिवासी असलेले १० ते १२ भाविक नांदेड जिल्ह्यातील सहस्त्रकुंड धबधबा येथे महादेवाच्या दर्शनासाठी आले होते. दर्शन आटोपून ते सायंकाळी कमांडर जीपने तेलंगणाकडे परतत असताना तोटंबा घाटात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यावेळी जीप (क्र. एपी २५ एएच ६७४७) रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जाऊन आदळली आणि या भीषण दुर्घटनेत ३ भाविकांचा जागीच तर चालकाचा रुग्णालयात नेत असताना मृत्यू झाला. मृतांमध्ये तुम सायलू (६०), तुम गौराबाई (६०), आवला गंगाधर (५५, रा. पार्डी, ता. कुबेर, जि. निर्मल, तेलंगणा) यांच्यासह चौघांचा समावेश आहे. या अपघातात ६ जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी म्हैसा येथे हलविण्यात आले.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जीपमध्ये अडकलेल्या जखमी प्रवाशांना बाहेर काढून तातडीने उपचारासाठी वाहनाने तेलंगणातील म्हैसा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमींची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. अपघाताची माहिती मिळताच नातेवाईकांनी रुग्णालयाकडे धाव घेतली. या दुर्घटनेने नातेवाईकांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# मेस्सीचा आंतरराष्ट्रीय फुटबॉलला अलविदा

**वृत्तसंस्था, ब्युनस आयर्स**
अर्जेंटिनाचा स्टार फुटबॉलपटू लिओनल मेस्सी याने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केली. त्यामुळे त्याच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. या निर्णयामुळे तो पुन्हा कधी अर्जेंटिनाच्या राष्ट्रीय संघात दिसणार नाही. फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील अंतिम सामना त्याच्या कारकिदीर्तील शेवटचा सामना ठरला. या सामन्यात अर्जेंटिनाला पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे सलग दोनदा जेतेपद मिळवण्याचे स्वप्न भंगले होते.



फुटबॉलमधून निवृत्ती घेताना मेस्सी म्हणाला की, हा निर्णय घेताना मला खूप त्रास झाला आणि अजूनही होत आहे, पण आता थांबण्याची वेळ आली आहे. त्याने अर्जेंटिनासाठी एकूण २०७ सामने खेळले. अर्जेंटिनासाठी सर्वाधिक सामने खेळणारा खेळाडू म्हणून त्याच्या नावावर विक्रम नोंदवला गेला.

या कालावधीत त्याने अर्जेंटिनासाठी एकूण १२५ गोल मारले आहेत. अर्जेंटिनाचा ऑल-टाईम लीडिंग गोल स्कोअरर म्हणूनही त्याच्या नावावर विक्रम आहे. त्याच्या फुटबॉल कारकि-र्दीत एकदा फिफा वर्ल्ड कप स्पर्धेवर नाव कोरले आहे. तसेच प्रतिष्ठेचा कोपा अमेरिका कप दोन वेळा जिंकला. बॅलन डी ओर आठ वेळा मिळवला. इतक्या वेळा हा पुरस्कार मिळवणारा तो जगातील एकमेव खेळाडू आहे.

**थोडक्यात**

## तांत्रिक बिघाडामुळे नीट-पीजी परीक्षेत गोंधळ

**जयपूर :** वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेशासाठी रविवारी घेण्यात आलेल्या नीट-पीजी २०२६ परीक्षेला जयपूरमधील दोन केंद्रांवर तांत्रिक बिघाडाचा फटका बसला. सिटापुरा येथील दोन केंद्रांवर परीक्षा उशिराने सुरू झाली. त्यानंतर परीक्षा सुरू असतानाच संगणक वारंवार बंद पडल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला. या प्रकारामुळे गोंधळ निर्माण झाला. संतप्त विद्यार्थ्यांनी केंद्राबाहेर येत आंदोलन केले. सिटापुरा येथील आयऑन डिजिटल झोनच्या दोन केंद्रांवर सकाळी ९ वाजता परीक्षा सुरू होणे अपेक्षित होते. मात्र, परीक्षा सुरू होण्यास विलंब झाला. परीक्षा सुरू झाल्यानंतरही संगणक प्रणाली वारंवार बंद पडत होती. सहा ते सात वेळा ही समस्या निर्माण झाल्याचा दावा करण्यात आला. काही विद्यार्थ्यांनी त्याहून अधिक वेळा संगणक बंद पडल्याचे सांगितले. संगणक पुन्हा सुरू झाल्यानंतर काही विद्यार्थ्यांच्या पडद्यावर मोजकेच प्रश्न दिसले व पुन्हा संगणक बंद पडल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

## सीजेपीच्या मोर्च्यावर बंदीस सर्वोच्च नकार

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने ५ सप्टेंबर रोजी दिल्लीत होणाऱ्या कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) च्या मोर्चावर बंदी घालण्यास नकार दिला. न्यायालयाने म्हटले की, या मोर्चामुळे कोणतीही अप्रिय घटना घडेल, असे मानण्याचे कोणतेही ठोस कारण नाही. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी सांगितले की, प्रशासनाकडून अपेक्षा आहे की ते कायदा व सुव्यवस्था राखतील आणि सर्व पक्षांनी जबाबदारीने व कायद्यानुसार काम करावे याची खात्री करतील. ही याचिका निवृत्त दिल्ली पोलिस अधिकारी राजेंद्र सिंह यांनी दाखल केली होती. त्यांनी म्हटले की, दिल्लीत होणाऱ्या ब्रिक्स परिषदेच्या पार्श्वभूमीवर मोठ्या मिरवणुका आणि निदर्शनांना परवानगी देऊ नये. कॉकरोच जनता पार्टीने शनिवारी सरकारवर मागण्या पूर्ण न केल्याचा आरोप केला. सीजेपीने एक्स वर लिहिले की, सरकार प्रत्येक वेळी अपूर्ण आश्वासने देऊन वाचू शकत नाही.

सरकारसमोर ठेवलेल्या चारपैकी तीन मागण्या अजूनही अपूर्ण आहेत. पहिली विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना नुकसान भरपाई दिली जावी. दुसरी विद्यार्थ्यांविरुद्ध दाखल केलेली एफआयआर मागे घेतली जावी आणि कोणतीही कारवाई केली जाऊ नये. तिसरी आरएएफ आणि दिल्ली पोलिसांनी माफी मागावी. कॉकरोच पार्टी ५ सप्टेंबर रोजी पुन्हा दिल्लीत मोर्चा काढणार आहे. त्यांनी लोकांना यात सहभागी होण्याचीही विनंती केली.

# ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची प्रकृती बिघडली, मुंबईत आयसीयूमध्ये भरती

**वृत्तसंस्था, मुंबई**
ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या आरोग्याबाबत एक अत्यंत मोठी बातमी समोर येत आहे. अण्णा हजारे यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना मुंबईतील प्रसिद्ध बॉम्बे हॉस्पिटलच्या आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले आहे. सध्या डॉक्टरांचे एक विशेष पथक त्यांच्या आरोग्यावर बारीक लक्ष ठेवून असून त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू आहेत.



अण्णा हजारे यांना गंभीर स्वरूपाचा संसर्ग आणि डिहायड्रेशनचा म्हणजेच शरीरातील पाण्याचे प्रमाण प्रचंड कमी होण्याचा त्रास झाल्यानंतर त्यांना अधिक चांगल्या उपचारांसाठी तातडीने मुंबईत हलवण्यात आले आहे.

सध्या अण्णा हजारे यांना बॉम्बे हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात डॉक्टरांच्या विशेष निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे. प्रसिद्ध फिजिशियन डॉ. गौतम भन्साळी आणि त्यांच्या टीमच्या देखरेखीखाली अण्णांवर उपचार सुरू आहेत. डॉक्टर सध्या त्यांच्या विविध वैद्यकीय चाचण्या करत असून, या चाचण्यांच्या अहवालानंतर पुढील उपचारांची दिशा ठरवली जाणार आहे.

**तीव्र तापाने आणि अशक्तपणाने अण्णा त्रस्त**

गेल्या अनेक दिवसांपासून अण्णा हजारे यांची प्रकृती अस्वास्थ होती. त्यांना प्रचंड खोकला, तीव्र ताप, अशक्तपणा आणि शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे असा त्रास होत होता. प्रकृतीत कोणतीही सुधारणा होत नसल्याने आणि आजारपणामुळे ते अत्यंत अशक्त झाल्याने डॉक्टरांनी त्यांना तातडीने मुंबईला हलवण्याचा निर्णय घेतला. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असली तरी अशक्तपणामुळे त्यांना आयसीयू नोंदवून ठेवण्यात आले आहे.

**राळेगणसिद्धीहून रुग्णवाहिकेने आणले मुंबईत**

अण्णा हजारे यांच्यावर आधी त्यांच्या मूळ गावी म्हणजेच अहिल्यानगर जिल्ह्यातील राळेगण सिद्धीजवळील रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, प्रकृती खालावल्याने डॉक्टरांच्या एका विशेष पथकाने त्यांना रुग्णवाहिकेद्वारे मुंबईत आणले. अण्णा हजारे मागील काही काळापासून प्रकृतीच्या कारणास्तव सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये कमी सक्रिय दिसतात. त्यांच्या प्रकृतीची बातमी समजताच देशभरातून त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी प्रार्थना केली जात आहे.







संपादकीय लेखणीतून...

# पत्रलेखन : लेखन परंपरा जतन आणि व्यक्तिमत्त्व विकास

जागतिक पत्रलेखन दिन, दरवर्षी १ सप्टेंबरला साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांमध्ये पत्रलेखनाची परंपरा जपणे आणि त्या अनुषंगाने व्यक्तिमत्व विकासास प्रोत्साहन देणे. इंटरनेट, ई-मेल्स, आणि सोशल मीडियाच्या युगात पत्रलेखनाची परंपरा कमी झाली आहे. पत्रं हा एक वैयक्तिक आणि संवेदनशील संवादाचा मार्ग असतो. हे केवळ शब्दांचं नव्हे, तर त्या शब्दांमागील भावना, विचार आणि मनाचा आविष्कार असतो. पत्रलेखनाद्वारे आपण आपल्या भावना, विचार, अनुभव आणि स्वप्नं व्यक्त करू शकतो. पत्रं लिहिताना शब्दांमध्ये अधिक काळजी, नेमकं विचार आणि आत्मसंयम आवश्यक असतो. पत्रं हे कायमस्वरूपी स्वरूपाचं असतात, ज्यांना आपण पुन्हा पुन्हा वाचू शकतो, जपून ठेवू शकतो.

पत्रलेखन म्हणजे आपल्या भावना, विचार, मागण्या किंवा माहिती लिखित स्वरूपात दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे प्रभावी माध्यम म्हणजेच "पत्र" होय. मराठी व्याकरणात आणि उपयोजित लेखनात पत्राचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतातः पत्र प्रकार- १. औपचारिक पत्र कशाला म्हणतात कार्यालयीन, व्यावसायिक, शासकीय किंवा विनंती/तक्रार करण्यासाठी जी पत्रे लिहिली जातात, त्यांना औपचारिक पत्रे म्हणतात. कोणाला लिहितात? शाळा/महाविद्यालयाचे प्राचार्य, नगरपालिकेचे अधिकारी, बँक व्यवस्थापक, संपादक इ...


स्वरूपः यात भाषा अधिकृत, मुद्देसूद आणि औपचारिक असावी लागते. मुख्य विषयाचा स्पष्ट उल्लेख करावा लागतो.

पत्र प्रकार- २. अनौपचारिक पत्र कशाला म्हणतात? कुटुंब, नातेवाईक आणि जवळच्या मित्रांना जिव्हाळ्याची भाषा वापरून लिहिलेली पत्रे म्हणजे अनौपचारिक पत्रे होत. कोणाला लिहितात? आई-वडील, भाऊ-बहीण, मित्र-मैत्रिणी इ.. स्वरूपः या पत्रांची भाषा प्रेमाची, आपुलकीची आणि अनौपचारिक असते. यात सुख-दुःख किंवा कौशल्याची विचारपूस केली जाते.

पत्रलेखनाचे महत्त्वाचे घटकः १) पत्ता आणि दिनांकः पत्र लिहिणाऱ्याचा पत्ता व दिनांक सामान्यतः डाव्या किंवा उजव्या बाजूला (नव्या पद्धतीनुसार सर्व माहिती डाव्या बाजूला समास सोडून लिहिली जाते.) २) संबोधनः नात्यानुसार किंवा पदांनुसार योग्य संबोधन (उदा. माननीय, आदरणीय, प्रिय मित्र) लिहिले जाते. ३) मुख्य मजकूरः पत्राचा मुख्य विषय स्पष्ट आणि मोजक्या शब्दांत मांडणे. ४) समारोपः पत्र संपवताना योग्य शिष्टाचार किंवा प्रेमाचे शब्द वापरून स्वाक्षरी करणे, असते. या दिवसाच्या निमित्ताने लोकांना पत्रं लिहिण्याचं महत्त्व पटवून दिलं जातं आणि त्या जुन्या सुंदर परंपरेला पुन्हा एकदा पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न केला जातो. वर्ल्ड लेटर राइटिंग डे आपल्याला आपल्या प्रियजनांशी संपर्क साधण्याची, त्यांच्या मनाचा ठाव घेण्याची एक अनोखी संधी देतो. पत्रं लिहिण्याची परंपरा जपून ठेवणं हे आपल्यासाठी सांस्कृतिक आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचं आहे.

# 'एकते'च्या दुष्मनांचा पराभव

झाडाझडती



विनोद देशमुख

"ते आले, ते बोलले आणि ते उपस्थितांना (जगभरातील उत्सुक ऑनलाईन प्रेक्षकांना, श्रोत्यांना आणि वाचकांनाही) जिंकून गेले..." राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या न्यूयॉर्कमधील बहुचर्चित भाषणाचं वर्णन असंच करावं लागेल. संघाच्या दुसऱ्या शतकाच्या प्रारंभीच नवा इतिहास घडविणारा हा प्रसंग आहे. भारताच्या सनातन (म्हणजेच आजच्या हिंदू) धमार्चं मुख्य सारंच त्यांनी सूत्रबद्ध पद्धतीनं मांडलं आणि विविधतेत एकता हा विषय लोकांच्या मनावर बिंबवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. अर्थात जगभरातील हिंदुद्वेष्टे आणि संघद्वेष्टे हे मान्य करणार नाहीत. कारण, सरसंघचालकांच्या अमेरिका भेटीचा एवढा बाऊ करूनही न्यूयॉर्कच्या मॅडिसन स्क्वेअर गार्डनमधील त्यांचं नियोजित भाषण झालंच अन् तेही प्रभावी झालं, ही गोष्ट त्यांना सतत सलत राहणार. म्हणूनच आता त्या भाषणावर वेड्यावाकड्या प्रतिक्रिया पसरविल्या जात आहेत.

त्यांचं मुख्य दुःख, हे भाषण झालं, हे आहे. हा कार्यक्रम जाहीर होताच हिंदुत्व विरोधकांनी त्यात खोडा घालण्याचे आटोकाट प्रयत्न केले. संघप्रमुखांचा दौराच अमेरिकेनं रद्द करण्याच्या दृष्टीनं हालचाली झाल्या. परवानगी, व्हिसा नाकारण्याच्या मागण्या करण्यात आल्या. उघडउघड इस्लामवादी असलेले न्यूयॉर्कचे महापौर ममदानी यांना हाताशी धरून कार्यक्रम हाणून पाडण्याचे सर्वतोपरी प्रयत्न झाले. तरीही भाषण झालंच. तेव्हा आता माध्यमांचा वापर करून भाषणाचा प्रभाव कमी करण्याचा डाव टाकण्यात आला आहे. हजारो भारतीयांनी मॅडिसन चौकात याविरुद्ध निदर्शनं केली, हे वारंवार सांगितलं-दाखवलं जात आहे. अशा विरोधाच्या वावटळीतही भाषण व्यवस्थित झालं आणि उपस्थितांनी वेळोवेळी दाद देत सकारात्मक प्रतिसादही दिला. विरोधकांचा पहिला डाव फसला आहे.

नव्हे, उलटलाच आहे. डॉ. भागवत यांनी विश्वबंधुत्व एवढ्या ठामपणे आणि सविस्तर मांडलं की, उचापतखोरांची बोलतीच बंद झाली. त्यांना अपेक्षित इतरांवर टीकाटिप्पणी वगैरे काहीच नाही. मानव सारे एक आहेत, हे मुख्य सूत्र. विविधता असूनही एकत्त्व साधता येतं, वेगवेगळ्या समूहांना स्वतःचं वैशिष्ट्य जपूनही इतरांशी मिसळता येतं हा संदेश त्यांनी ठासून दिला. जन्मभूमी आणि कर्मभूमी यांची सांगड घालताना, कर्मभूमी प्रथम आणि मग शक्य झाल्यास जन्मभूमीसाठी काही करण्याचा संदेश अमेरिकावासी भारतीयांना दिला. अमेरिका किंवा अन्य कोणताही देश अशा सल्ल्यानं सुखावणारच की नाही. संघ आणि हिंदू नेते किती संवेदनशील आहेत, याचाच प्रत्यय यातून जगाला आला असणार.

विरोधकांना नेमकं हेच नको आहे. इतरांशी ऐक्य, मधुर संबंध, माणुसकी वगैरे शब्द त्यांच्या डिक्शनरीतच नाहीत. ममदानी न्यूयॉर्कचे महापौर होताच त्यांनी सुरू केलेले उद्योग जगाला माहीत आहे. अशा माणसाची मदत घेऊन मोहनजींचा कार्यक्रम हाणून पाडण्याचा प्रयत्न करणारे भारतातील अस्वस्थ आत्मेही त्याच दर्जाचे अन् कुरापती. कोणी एक होताना दिसले की बिबा घालायचा ! तो प्रयत्न यावेळी फळला नाही. उलट, त्यांच्या नाकावर टिच्चून सरसंघचालकांनी अमेरिकेच्या आर्थिक राजधानीत सनातन धमार्चं मानव कल्याणाचं तत्त्वज्ञान सोप्या शब्दात सांगत हिंदुत्वच मांडलं. हळूहळू का होईना, हे जगात स्वीकारलं गेलं तर जागोजागी उत्पात माजवणाऱ्या विभाजनवाद्यांचा आपोआपच पराभव होईल आणि विश्वगुरुपद भारताकडे चालून येईल, अशी आशा यातून निर्माण झाली आहे.

या कार्यक्रमात नव्हे, तर अन्यत्र बोलताना मोहनजींनी मुस्लिमांबद्दल केलेलं एक विधान वादग्रस्त ठरविण्याचे प्रयत्न सध्या सुरू आहेत. त्यापासून सावध राहण्याची गरज आहे. "भारतातून मुसलमानांना हाकलून लावा, असं म्हणणारा हिंदू असूच शकत नाही" असं ते म्हणाल्याची क्लिप खूप व्हायरल झाली आहे. या विधानाचा खरा अर्थ समजून घेतला पाहिजे. एक- आज देशात २५ कोटींपर्यंत मुस्लिम आहेत. ही संख्याच वरील मुद्दा अव्यवहार्य ठरवून निकालात काढते. दोन- भारतीय मुस्लिम आणि हिंदू यांचा डीएनए एकच असल्यानं संघ त्यांना आपलाच मानतो. तीन- आतंकी, देशद्रोही, उचापतखोर मुस्लिम मात्र खपवून घेता कामा नये, ही संघाची भूमिका आहे. हे लक्षात घेतलं तर वरील वाक्यातून मोहनजींना काय म्हणायचं आहे, ते स्पष्ट होतं. त्यामुळे विविधतेत एकता मान्य नसलेल्या उचापतखोर विरोधकांच्या कारवायांना हिंदू समाजानं बळी पडू नये आणि विविधतेत एकता टिकवून ठेवण्यास हातभार लावत राहावा, हाच न्यूयॉर्कचा संदेश होय.

**- ज्येष्ठ पत्रकार, नागपूर**

# ज्ञानाची डिजिटल कत्तल: एआय ट्रेनिंगसाठी दुर्मिळ पुस्तकांचा बळी

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

आजच्या डिजिटल युगात अत्यंत विचार करायला लावणारा महत्वाचा प्रश्न म्हणजे तंत्रज्ञानाच्या वेगाने आपण प्रगती करत असताना, नकळतपणे आपण आपली भाषा, वाचनसंस्कृती आणि साहित्यिक वारसा नष्ट करत आहोत का, हा प्रश्न उभा ठाकला आहे.

सोशल मीडियावर 'नमस्कार' ऐवजी 'Hi', आणि 'धन्यवाद' ऐवजी '३८' किंवा '३ँ७' वापरून आपण शब्दांचे सौंदर्य नष्ट करत आहोत.पण त्याहीपेक्षा ज्ञानाचा अमोल वारसा धोक्यात आला आहे कारणकृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) मॉडेल्सना प्रशिक्षित करण्यासाठी टेक कंपन्यांकडून दुर्मीळ आणि जुन्या छापील पुस्तकांचे 'डिस्ट्रक्टिव्ह स्कॅनिंग' करून त्यांचा भौतिक नाश केला जात आहे. टेक कंपन्यांनी आपला मोर्चा आता दुर्मिळ पुस्तकांकडे वळवला आहे.

इंटरनेटवरील मजकुरापेक्षा पुस्तकांमधील मानवी लेखन अधिक प्रगत, व्याकरणशुद्ध आणि उच्च दर्जाचे असते. एआय कंपन्यांकडे उपलब्ध असलेला ऑनलाइन डेटा अपुरा पडत असल्याने त्यांनी मुद्रित पुस्तकांकडे मोर्चा वळवला आहे. शतकानुशतके टिकून राहिलेले ऐतिहासिक ग्रंथ आणि दुर्मिळ वैचारिक वारसा केवळ काही सेकंदांच्या एआय टोकन्ससाठी नष्ट केला जात आहे एकदा मूळ पुस्तक नष्ट झाले की, भविष्यातील इतिहासकार आणि संशोधकांसाठी ती माहिती कायमची गमावली जाते.

कृत्रिम बुद्धिमत्ता(एआय) ट्रेनिंगसाठी मोठ्या प्रमाणावर डेटा आणि पुस्तकांचा वापर केला जात आहे, ज्याला डिजिटल भाषेत 'कत्तल' किंवा गैरवापर म्हटले जात आहे. ही बाब सध्या जागतिक स्तरावर तीव्र वादाचा विषय बनली आहे.

अनेक अककंपन्या लेखकांची आणि प्रकाशकांची परवानगी न घेता, त्यांच्या दुर्मिळ व मौल्यवान पुस्तकांचा वापर आपले मॉडेल ट्रेन करण्यासाठी करत आहेत. पुस्तकांमधील ज्ञानाचा वापर करून अकस्वतः साहित्य तयार करत आहे, ज्यामुळे मूळ लेखकांच्या हक्कांवर आणि कमाईवर गदा येत आहे.दुर्मिळ आणि ऐतिहासिक पुस्तकांचे डिजिटल स्कॅनिंग करून ते डेटाबेसमध्ये समाविष्ट केले जात आहे, ज्यामुळे मूळ मालकी हक्क नष्ट होण्याचा धोका आहे.

ज्ञान समृद्ध करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर होणे चांगले आहे, परंतु त्यासाठी मूळ ज्ञाननिर्मिती करणाऱ्यांच्या कष्टांची आणि हक्कांची पायमल्ली होणे नक्कीच चिंताजनक आहे.तंत्रज्ञानाचा विकास व्हावा, पण तो कोणाचेही हक्क हिरावून घेता कामा नये.कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि इतर तंत्रज्ञान मूळ लेखकांच्या परवानगीशिवाय त्यांच्या साहित्याचा वापर करते. वर्षानुवर्षे संशोधन करून माहिती गोळा करणाऱ्यांच्या कष्टांना श्रेय मिळत नाही. मूळ ज्ञाननिर्मिती करणाऱ्यांना त्यांच्या कामाचा योग्य आर्थिक मोबदला मिळत नाही.

जगभरातील अनेक प्रसिद्ध लेखकांनी आणि प्रकाशन संस्थांनी मोठ्या एआय कंपन्यांवर (जसे की OpenAI, Microsoft, Meta) कॉपीराईट उल्लंघनाचे खटले दाखल केले आहेत. तंत्रज्ञानाचा विकास आणि नैतिकतेचा समतोल राखण्यासाठी जागतिक स्तरावर कडक कायदे बनवण्याची मागणी होत आहे. लेखकांना त्यांचे साहित्य अक ट्रेनिंगमधून बाहेर ठेवण्याचाअधिकार मिळावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

तंत्रज्ञानाचा वापर केवळ मार्गदर्शक म्हणून व्हावा, मूळ निर्मितीची जागा घेण्यासाठी नाही. माहितीचा स्त्रोत आणि मूळ लेखकाचा नामनिर्देशन करणे बंधनकारक असावे. डिजिटल युगात मूळ निर्मात्यांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी कठोर नियम असायला हवेत.तंत्रज्ञानाने प्रगती जरूर करावी, परंतु मानवी श्रम आणि अधिकारांचा आदर करूनच पुढे जाणे योग्य ठरेल.

- ९५६१५९४३०६

# देशासाठी 'वर्कलोड मॅनेजमेंट', मग आयपीएलमध्ये कसली कमिटमेंट?

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय मालिकेची वेळ आली की अचानक खेळाडूच्या पाठीत रग भरते, हॅमस्ट्रिंग ताणले जाते किंवा 'वर्कलोड मॅनेजमेंट'चे कारण सांगून विश्रांती दिली जाते. पण चमत्कार असा की, दोन महिन्यांच्या आयपीएलच्या मोसमात याच खेळाडूंच्या शरीरात कोणती संजीवनी संचारते, हा प्रत्येक प्रामाणिक भारतीय क्रिकेट चाहत्याला पडलेला जळजळीत प्रश्न आहे.

**आर्थिक गणिते आणि फ्रँचायझीचा दबाव**

कोट्यवधींचे करारः आयपीएलमध्ये मिळणारा प्रचंड पैसा आणि फ्रँचायझींसोबत असलेले व्यावसायिक करार खेळाडूंवर एक वेगळा मानसिक दबाव तयार करतात. सामने चुकवले तर पुढच्या लिलावात किंमत घसरेल ही भीती असते.

कडक व्यावसायिक देखरेखः फ्रँचायझी आपल्या प्रत्येक खेळाडूच्या फिटनेसवर कोट्यवधी रुपये खर्च करते. खेळाडूने मैदानावर उतरावेच यासाठी तिथले फिजियो आणि सपोर्ट स्टाफ जीवाचे रान करतात.

**खेळाचे स्वरूप आणि शारीरिक ताण**

केवळ ४ ओव्हर्सचा खेळः टी-२० क्रिकेटमध्ये गोलंदाजाला फक्त ४ षटके टाकायची असतात आणि क्षेत्ररक्षण २० षटकांचे असते. याउलट, कसोटीत दिवसाला २०-२५ षटके टाकणे किंवा ५ दिवस मैदानावर टिकून राहणे शारीरिकदृष्ट्या दुप्पट कठीण असते.

दुखापती लपवण्याची सवयः आयपीएलदरम्यान वेदना शामक किंवा तात्पुरती इंजेक्शन्स घेऊन





खेळाडू सामने खेळून काढतात. मात्र, या दोन महिन्यांच्या अतिताणाचा स्फोट थेट त्यानंतर येणाऱ्या आंतरराष्ट्रीय दौऱ्यांवर दुखापतीच्या रूपात होतो.

**दुखापतींची ही संशयास्पद 'टायमिंग' बघाः**

दीपक चहर आणि मोहम्मद शमीः चहर भारताच्या महत्त्वाच्या मालिकांना दुखापतींमुळे वर्षानुवर्षे मुकतो, पण चेन्नई सुपर किंग्सच्या पहिल्या सामन्यापासून उपलब्ध असतो. शमी आयपीएलमध्ये संपूर्ण १४ सामने खेळून काढतो आणि लगेच आयसीसी स्पर्धांच्या उंबरठ्यावर त्याच्या शस्त्रक्रियांचे नियोजन होते.

हार्दिक पांड्याः २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात दुखापतग्रस्त झालेला हार्दिक महिनाभराच्या महत्त्वाच्या सामन्यांना मुकला, घरगुती क्रिकेट खेळला नाही; पण २०२४ च्या आयपीएलच्या पहिल्याच दिवशी मुंबई इंडियन्सचे कर्णधारपद सांभाळायला १००% फिट दिसला.

के. एल. राहुल आणि श्रेयस अय्यरः लंडनमध्ये शस्त्रक्रिया, एनसीएमध्ये महिनान्‌महिने रिहॅब, भारताच्या द्विपक्षीय मालिकांमधून माघार; पण आयपीएलचा लिलाव किंवा मोसम जवळ आला की हे खेळाडू अचानक तंदुरुस्त कसे होतात?

**आर्थिक गणिते आणि '४ ओव्हर्स'ची सोय**

पैशांचा दबावः फ्रँचायझींसोबतचे कोट्यवधींचे करार आणि ब्रँड व्हॅल्यू टिकवण्याची चिंता खेळाडूंना विश्रांती घेऊ देत नाही. आयपीएलमध्ये 'पेनकिलर्स' घेऊन किंवा तात्पुरती इंजेक्शन्स मारून खेळाडू खेळतात, आणि त्याचा अंतिम फटका नंतरच्या राष्ट्रीय मालिकांमध्ये बसतो.

कमी शारीरिक कष्टः आयपीएलमध्ये गोलंदाजाला फक्त ४ षटके टाकायची असतात. याउलट, कसोटीत दिवसाला २०-२५ षटके टाकणे किंवा ५ दिवस मैदानात घाम गाळणे टाळण्यासाठी खेळाडू आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दुखापतीचे कारण पुढे करतात.

**बीसीसीआय आणि राष्ट्रीय निष्ठा**

विश्रांतीची सोपी पळवाटः राष्ट्रीय संघातून 'विश्रांती' मागणे खेळाडूंसाठी अतिशय सोपे झाले आहे. आयपीएलमध्ये मात्र एकाही सामन्यातून स्वेच्छेने विश्रांती घेण्याची हिंमत कोणी दाखवत नाही.

प्राधान्य कशाला?: देशाची जर्सी घालणे हा कधीकाळी सर्वोच्च सन्मान मानला जात होता. आज दुदैवाने राष्ट्रीय सामने हे दुखापतींमधून सावरण्याचे किंवा पुढील आयपीएलची तयारी करण्याचे 'प्लॅटफॉर्म' बनत चालले आहेत.

जोपर्यंत बीसीसीआय 'देश आधी, लीग नंतर' हे धोरण कठोरपणे राबवत नाही आणि आयपीएलच्या काळात खेळाडूंच्या वर्कलोडवर नियंत्रण आणत नाही, तोपर्यंत आयपीएलमध्ये धावणारे घोडे भारतासाठी खेळताना लंगडतच राहतील. खेळाडूंनी आता ठरवायला हवे—त्यांची खरी निष्ठा तिरंग्याशी आहे की फ्रँचायझींच्या तिजोरीशी?

- ९०९६३७२०८२.

# गुराढोरांवर आपली आस्था असतांना, शहरात गुरं-ढोरं वाऱ्यावर का?

**रमेश लांजेवार**
**नागपूर**

आपण पहातो ही, राज्यातील अनेक शहरांमध्ये गुरेढोरे लावारीस मोकाट फिरतांना दिसतात किंवा रस्त्यावर मोकाट जनावरांचा ठिय्या दिसून येतो.यामुळे वाहनचालकांचा किंवा जनावरांचा अपघात होऊन जीव धोक्यात येऊ शकतो आणि अशा अनेक दुर्घटना झाल्या सुध्दा आहेत व ही बाब सर्वांनाच ग्यात आहे. तरीही सरकार किंवा प्रशासन याकडे जातीने लक्ष देत नाही हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे. आपल्या हिंदू संस्कृतीमध्ये गायीला अत्यंत मोलाचे आणि महत्त्वाचे स्थान आहे त्यामुळे तीला गोमाता म्हणून संबोधले जाते.परंतु आज मोठ्या प्रमाणात गायी (गुरेढोरे) रस्त्याच्या कडेला किंवा रस्त्यावर किंवा मुलांच्या खेळण्याच्या ग्राऊंडमध्ये बसलेले दिसतात आणि आपल्या आहारासाठी व विसाव्यासाठी भटकत असतात. त्याचप्रमाणे गायी जेव्हा रस्त्यावर किंवा वस्तीमध्ये फिरतात तेव्हा त्यांचा झुंड कचऱ्याच्या ढीगाऱ्याकडे जातांना जास्त दिसते कारण त्यांना आशा असते की, इथे मला काही तरी नक्कीच खायला मिळेल परंतु याठिकाणी त्यांच्या दृष्टीने संपूर्ण विषेली पदार्थ असतात.अशा परिस्थितीत गुरेढोरे जहरील्या वस्तू खातात;ज्या त्यांच्या शरीराला घातक असतात. उदाहरण द्यायचे झाले तर,प्लास्टिक,कपडा किंवा प्लॅस्टिकमध्ये इंजेक्शन किंवा ब्लेड किंवा विषेली पदार्थ सुद्धा असू शकतात;त्या जर त्यांच्या पोटात चुकीने गेल्या तर त्यांच्या जिवाला मोठा धोका निर्माण होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही.

अशा परिस्थितीत मनपा प्रशासन व नगरसेवकांचे दायित्व असते की,गोरक्षाच्या माध्यमातून प्रत्येक जनावरांचा जीव वाचविला पाहिजे.परंतु त्यांची रक्षा न करता त्यांना वाऱ्यावर सोडल्याचे चित्र नागपूरसह राज्यातील अनेक शहरांमध्ये मोकाट फिरणाऱ्या गुराढोरांवरून लक्षात येते. उदाहरण द्यायचे झाले तर,नागपूर येथील प्रभाग क्रमांक ३१ मध्ये राजीव गांधी पार्क या ठिकाणी बास्केट बॉल ग्राउंड आहे. परंतु या ग्राउंडमध्ये मोठ्या प्रमाणात गुरेढोरे जमा होतात. अशा परिस्थितीत ते आपसात भिडतात व त्यांची टक्कर होते अशा परिस्थितीत बास्केटबॉल खेळणाऱ्या खेळाडूंचा अपघात होऊ शकतो. या संपूर्ण बाबींचा विचार करून मनपा प्रशासनाने आणि नगरसेवकांनी यावर तोडगा काढुन गुराढोरांसाठी योग्य जागा उपलब्ध करावी किंवा मोकाट जनावरांना गोशाळेत स्थान द्यावे. कारण गुरेढोरे रस्त्याच्या कडेला किंवा रस्त्यावर बसले असतात तेव्हा त्यांचा किंवा मानवी अपघात सुध्दा होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही.याकरीता मोकाट फिरणाऱ्या जनावरांच्या पुनर्वसनासाठी प्रशासनाने पुर्वनीयोजीत उपाययोजना करणे



गरजेचे आहे. मोकाट जनावरांचा सर्वसामान्यांना त्रास नाहीच परंतु त्यांच्या खानपानात विषेली वस्तू जाने किंवा कळतनकळत रस्त्यावर बसलेल्या जनावरांचा किंवा मानवी अपघात होने ही दुःख बाब आहे.त्यामुळे नागपूर शहरात असो अथवा राज्यातील इतर शहरात असो मोकाट गुराढोरांची व्यवस्था गोशाळेत व्हायला पाहिजे हे प्रशासनाचे दायित्व आहे.

मुसळधार पाऊस,निसरडे रस्ते, रस्त्यावरील खड्डे,कमी झालेली दृश्यमानता आणि त्यातच अचानक समोर येणारे मोकाट जनावरे नागपूरकर वाहनचालकांसाठी हा अनुभव रोजचाच झाला आहे आणि हिच स्थिती राज्यातील अनेक शहरांमध्ये असु शकते. अशाप्रकारे पावसाळ्यात रस्त्यावर वाढलेल्या मोकाट जनावरांच्या वावरामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. नागपूरसह राज्यातील अनेक शहरांमध्ये वर्षांगणिक मोकाट जनावरांचा प्रश्न अधिक गंभीर होत असल्याचे दिसून येते. यामुळे पावसाळ्यात संभाव्य अपघात टाळण्यासाठी मनपा प्रशासनाने तातडीने विशेष मोहीम राबवून मोकाट जनावरांना योग्य स्थान देऊन त्यांना गोशाळेत पाठविण्यात आले पाहिजे, तसेच निष्काळजी पशुपालकांवर कारवाई करून शहरातील प्रमुख रस्ते,मुलांचे खेळण्याचे ग्राउंड सुरक्षित करावेत.

मोकाट जनावरांचा किंवा मोकाट जनावरांमुळे होणाऱ्या मानवी दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने मोकाट जनावरांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची नितांत आवश्यकता आहे.यामुळे मोकाट जनावरांची रहाण्याची, खानपानची योग्य सुविधा होईल व अपघातावर आळा बसेल. जय हिंद!

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# शासकीय योजना पोहोचविण्यात नवमाध्यमांचा प्रभावी वापर !

## संचालक डॉ. गणेश मुळे यांच्याकडून कार्याचा गौरव, जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार यांचा सत्कार व सेवानिवृत्ती सोहळा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार यांनी आपल्या सेवाकाळात शासकीय योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यात केलेला नवमाध्यमांचा वापर आणि जनसंपर्क क्षेत्रातील योगदान कौतुकास्पद आहे. शासनाची सकारात्मक प्रतिमा जनमानसात रुजविण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम आणि त्यांची कामावर असलेली निष्ठा माहिती विभागासाठी नेहमीच प्रेरणादायी राहील, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर - अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे यांनी केले.



जिल्हा माहिती अधिकारी रापतवार हे नियत वयोमानानुसार आज ३१ ऑगस्ट रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहामध्ये आयोजित एका बैठकीत संचालक डॉ. गणेश मुळे बोलत होते.

अमरावती विभागाचे उपसंचालक अनिल आलुरकर, जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार, मंगेश वरकड, श्रीमती शैलजा दांदळे, राजेश येसनकर, श्रीमती अंजू कांबळे, गजानन जाधव, सहायक संचालक (माहिती) श्रीमती अपर्णा यावलकर, अतुल पांडे, अनिल गडेकर, अविनाश महालक्ष्मे तसेच रापतवार यांच्या पत्नी वर्षा आणि कन्या निकेता रापतवार यावेळी उपस्थित होत्या.

रापतवार यांनी आपल्या कार्याप्रती नेहमी सजगता बाळगली. सर्व परिस्थितीत सकारात्मकता जोपासली. त्यामुळे ते उत्कृष्ट अधिकारी ठरले. पदे ही बिरुदावली असतात. आपली 'स्व' ओळख निर्माण करणे महत्त्वाचे आहे. रापतवार यांनी आपल्या कार्यातून आपली 'स्व' ओळख निर्माण करून आपला कार्यशैलीचा ठसा उमटविला आहे. ही कार्यशैली, येथील अनुभव त्यांना निवृत्तीनंतरच्या नवीन जबाबदाऱ्यांसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास संचालक डॉ. मुळे यांनी यावेळी व्यक्त केला.

सत्काराला उत्तर देताना रापतवार म्हणाले, माहिती खात्यातील सेवा ही केवळ एक नोकरी नसून जनतेशी नाळ जोडणारे माध्यम आहे. सहकाऱ्यांचे सहकार्य आणि पत्रकारांचे प्रेम यामुळेच मी ही वाटचाल यशस्वीपणे पूर्ण करू शकलो. मिळालेले प्रेम व सहकार्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.

यावेळी नागपूर संचालक कार्यालयाच्या वतीने संचालक डॉ.गणेश मुळे यांनी रापतवार व त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा रापतवार यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार केला. यावेळी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. उपस्थितांनी त्यांच्यासोबतच्या कामाच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या पुढील निरोगी व दीर्घ आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपर्णा यावलकर यांनी, तर आभार अंजू कांबळे यांनी मानले. यावेळी नागपूर संचालक कार्यालयातील तसेच जिल्हा माहिती कार्यालयातील अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

थोडक्यात

## चाचेर येथे किरात-किराड समाजाच्यावतीने भुजरीया- कजलिया पर्व उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

शनिवार (ता. २९ ऑगस्ट) ला दरवर्षीप्रमाणे यंदाही चाचेर गावातील किरात-किराड समाजाच्या वतीने अनेक वर्षांपासून जपली जाणारी भुजरिया-कजलिया पर्व यंदाही उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महिला भगिनींची पारंपरिक वेशभूषा, सजवलेली भुजरिया, ढोल-ताशे व बँडच्या गजरात भव्य रॅली काढण्यात आली. नाल्यावर भुजरियाचे पूजन व स्वच्छता करून पुन्हा गावातील प्रत्येक मंदिरात जाऊन देवचरणी अर्पण करून यानंतर राम राम, नमस्कार आणि वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद घेत एकमेकांप्रती प्रेम, सन्मान व बंधुभाव जपण्याचा सुंदर संदेश देण्यात आला.

याप्रसंगी रामटेक विधानसभा - ५९ बळीराजा पांदण रस्ते समिती सदस्य विकास झाडे, रोशन बरबटे, केशवराव झाडे, अनुराग बादोले, निरंजन बोदोले, स्वप्नील झाडे, अशोक गडे, अनिल खंडाईत रामेश्वर बादोले, बम्हानंद बादोले, शंकर गडे, किरन बरबटे, भोला बरबटे, समिर झाडे, प्रफुल बादोले, नरेश बादोले, सचिन बादोले, बाळा खंडाईत, उमेश महादुले, कमलेश झाडे, राजू झाडे, शुभम गडे, महेश महादुले, डॉ. दिनेश बादोले, अशोक झाडे, मयुर गडे, अमित खंडाईत, राकेश खंडाईत, रमेश खंडाईत, प्रशांत बरबटे सह सर्व समाज बांधव आणि महीला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'कर्णकर्कश' सायलेंसरला उमरेड वाहतूक पोलिसांचा ब्रेक

### ध्वनीप्रदूषणाला आळा घालण्यासाठी विशेष मोहीम; नियमबाह्य सायलेंसरवर दंडात्मक कारवाई



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

शहरातील रस्त्यांवरून धावणाऱ्या दुचाकींचा कर्णकर्कश आवाज नागरिकांच्या कानावर आदळत असताना, आता अशा वाहनचालकांना उमरेड वाहतूक पोलिसांनी चांगलाच ब्रेक लावला आहे. दुचाकींवर मॉडिफाइड सायलेंसर बसवून मोठ्या आवाजात वाहने चालविणाऱ्यांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम राबवत दंडात्मक कारवाई केली. शहरातील इतवारी पेठ, कावरापेठ, गदीर्ची ठिकाणे तसेच वर्दळीच्या परिसरात वाहतूक पोलिसांनी वाहनांची तपासणी केली. यावेळी कंपनीने निर्धारित केलेल्या सायलेंसरमध्ये बदल करून नियमबाह्य व मोठ्या आवाजाचे सायलेंसर बसविलेल्या वाहनांवर कारवाई करण्यात आली. 'स्टाईल'च्या नावाखाली होणारा कर्णकर्कश आवाज आता नागरिकांच्या त्रासाचे कारण बनत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी तसेच रुग्णांना या मोठ्या आवाजाचा त्रास होतो. त्याचबरोबर वाढत्या ध्वनीप्रदूषणामुळे शहरातील शांतताही भंग पावते. त्यामुळे वाहतूक पोलिसांची ही मोहीम नागरिकांच्या दृष्टीने दिलासादायक ठरत आहे.

मोठ्या आवाजातील सायलेंसरमुळे केवळ ध्वनीप्रदूषणच वाढत नाही, तर वाहनांच्या वेगावर नियंत्रण सुटल्यास अपघाताचा धोका देखील निर्माण होऊ शकतो. त्यामुळे वाहनचालकांनी कंपनीने निर्धारित केलेलाच सायलेंसर वापरावा आणि वाहनांमध्ये अनधिकृत बदल करू नयेत, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे. रस्ते सुरक्षित असावेत, शहर शांत असावे आणि वाहतूक शिस्तबद्ध असावी, या उद्देशाने नागरिकांनीही वाहतूक नियमांचे पालन करून पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच नियमबाह्य सायलेंसर वापरणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध यापुढेही नियमितपणे कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा उमरेड वाहतूक पोलिसांनी दिला आहे.

## मत्स्य व्यवसाय विभागात नोकरभरतीचे बनावट नियुक्तीपत्र; नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** महाराष्ट्र शासनाच्या मत्स्य व्यवसाय विभागाच्या नावाने बनावट नियुक्तीपत्र तयार करून सुशिक्षित बेरोजगारांची फसवणूक करण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पारशिवनी तालुक्यातील नवेगाव खैरी येथील मत्स्य बीज प्रजनन व उत्पादन केंद्रात कनिष्ठ लिपिक पदावर नियुक्ती झाल्याचे एक बनावट पत्र समाजमाध्यमांवर फिरत असून, नागरिकांनी अशा कोणत्याही आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन मत्स्य व्यवसाय विभागाने केले आहे. पेंच प्रकल्पांतर्गत असलेल्या नवेगाव खैरी मत्स्य बीज केंद्रात सध्या लिपिक अथवा कोणत्याही संवर्गातील पदांची थेट भरती प्रक्रिया सुरू नाही. मात्र, काही असामाजिक घटकांनी अधिकाऱ्यांची खोटी स्वाक्षरी आणि बनावट शिक्के वापरून २० ऑगस्ट २०२६ रोजीचे बनावट नियुक्तीपत्र (क्रमांक ४६३/२०२६) तयार केल्याचे निदर्शनास आले आहे. मत्स्य व्यवसाय विभागातील सर्व शासकीय पदे केवळ शासनमान्य अधिकृत संकेतस्थळ, वृत्तपत्रांतील जाहिराती आणि विहित नियमांनुसारच भरली जातात. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही मध्यस्थ, दलाल अथवा तोतया व्यक्तींच्या आमिषाला बळी पडून पैशांची देवाणघेवाण करू नये, असे आवाहन सहाय्यक मत्स्यव्यवसाय आयुक्त शुभम कोमरेवार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## चाचेर येथे बायोमास बँक आणि रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिर

### २२८ ग्रामस्थांनी घेतला लाभ

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

शेतकऱ्यांचे सक्षमीकरण, शेतीचा सर्वांगीण विकास आणि पर्यावरण संवर्धनाचा ध्यास घेतलेल्या 'बायोमास बँक' (बायोफ्युएलसर्कल) आणि रोटरी क्लब नागपूर डाऊनटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने आज चाचेर येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरात परिसरातील शेतकरी कुटुंब, महिला आणि बालकांसह एकूण २२८ ग्रामस्थांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना औषधोपचार पुरवण्यात आले.

**महिलांच्या आरोग्यासाठी विशेष कर्करोग तपासणी**

या आरोग्य शिबिराचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे महिलांमधील वाढत्या गर्भाशयाच्या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी विशेष तपासणी व मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने महिलांची प्राथमिक लक्षणे ओळखून विशेष चाचण्या केल्या, तसेच उपस्थित महिलांना वैयक्तिक स्वच्छता व पोषण आहाराबाबत मार्गदर्शन केले. तपासणीअंती गरजू रुग्णांना डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मोफत औषधांचे वाटप करण्यात आले.

**बायोमास बँकेचा नावीन्यपूर्ण उपक्रम:** शेती कचऱ्यातून समृद्धी व पर्यावरण रक्षणशेतात पिकांच्या काढणीनंतर उरणारा काडीकचरा (बायोमास) शेतातच जाळण्याची पारंपरिक पद्धत जमिनीचा कस कमी करते आणि पर्यावरणाचा समतोल बिघडवते. यावर मात करण्यासाठी 'बायोमास बँक' आधुनिक यांत्रिकीकरणाच्या साहाय्याने शेती अवशेषांचे संकलन करून शेतकऱ्यांना थेट शेत-स्वच्छतेची मोफत सुविधा व अतिरिक्त उत्पन्नाचा शाश्वत मार्ग उपलब्ध करून देत आहे. 'बायोमास बँक' हे सर्व डिजिटल प्लॅटफॉर्म द्वारे संचालित करते व शेतकरी



त्यांच्या शेतातील सफाई व्हाट्स अप चॅटद्वारे (७३८७४८९४९०) बुक करू शकतात. ही संकलित जैवसामग्री हरित ऊर्जा आणि हरित इंधन साखळीमध्ये वापरली जात असल्याने प्रदूषणमुक्त भविष्यासाठी हा उपक्रम क्रांतीकारी ठरत आहे.

**दर सहा महिन्यांनी शिबिर घेण्याची ग्रामस्थांची मागणी**

ग्रामीण भागातील नागरिकांसाठी अशा सर्वसमावेशक आरोग्य सुविधा एकाच छताखाली उपलब्ध झाल्यामुळे चाचेर आणि लगतच्या गावातील शेतकऱ्यांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत केले. गावात नियमित आरोग्य सेवेचा अभाव लक्षात घेता, बायोमास बँक व रोटरी क्लबने असे शिबिर दर सहा महिन्यांनी (अर्धवार्षिक) नियमितपणे आयोजित करावे, अशी आग्रही मागणी स्थानिक शेतकरी प्रतिनिधी व ग्रामस्थांनी केली.

याप्रसंगी बायोमास बँकेचे पुष्कर भोजराज जनरल मॅनेजर, ऑपरेशन्स, स्मिता मुळमुळे एचआर मॅनेजर, रोटरी क्लब नागपूर, प्राजक्ता मंगरूळकर डाऊनटाऊनच्या अध्यक्ष, वीरेंद्र पत्रिकार माजी अध्यक्ष, विक्रांत दारवेकर सचिव,तपासणी पथकातील तज्ज्ञ डॉ. जीवक काकडे, डॉ. स्नेहल तसेच स्थानिक शेतकरी व ग्रामपंचायत प्रतिनिधी सरपंच लुम्बिनी महेश कलारे,माजी सरपंच महेश गेंदलाल कलारे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानून शिबिराची यशस्वी सांगता झाली.

## जालना अत्याचार प्रकरण, बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांवर ॲट्रॉसिटी दाखल करून तत्काळ अटक करा!

### नागपूर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

जालना जिल्ह्यातील दलित समाजातील शेतकरी परमेश्वर हिवाळे यांना बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी अमानुषपणे मारहाण करून त्यांच्या तोंडात बळजबरीने शेण घातल्याची घटना ३१ ऑगस्टला घडली असून या विकृत कृत्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यात आला. या घटनेचे तीव्र पडसाद नागपुर जिल्ह्यात उमटले असून प्रकरणातील दोषींवर तत्काळ अनुसूचित जाती-जमीन अत्याचार प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना तत्काळ अटक करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली. कोराडी पोलीस स्टेशन मार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात असून एपीआय विनोद मात्रे यांनी निवेदन स्वीकारले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात इशारा देण्यात आला आहे की दलित समाजावर होणारे असे अमानुष अत्याचार खपवून घेतले जाणार नाहीत. पीडित परमेश्वर हिवाळे यांना त्वरित न्याय न मिळाल्यास आणि आरोपींवर कडक कारवाई न झाल्यास राज्यभरात तीव्र आंदोलन छेडले जाईल. या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या सर्व परिस्थितीची आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नाची संपूर्ण जबाबदारी गृहविभाग व राज्य शासनाची राहील, असा स्पष्ट इशारा महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाचे सचिव रत्नदीप रंगारी यांनी दिला आहे. यावेळी अभि बन्सोड, शरद मेश्राम, शंकर छत्री, निखिल गवंदे, विनीत मेंढे, गणेश शेंडे आदी उपस्थित होते. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट पसरली असून दोषी कार्यकर्त्यांवर लवकरात लवकर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

## श्री .पी. डी. जैन कला महाविद्यालयात राष्ट्रीय खेल दिवस साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, अनसिंग**

अनसिंग येथिल जैन कला महाविद्यालय या कार्यक्रम ला महाविदयालयाचे प्राचार्य श्री विवेक गुल्हाने सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थीत होते. त्यानी कार्यक्रमाची सुरुवात मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाचा गौरव केला शा.शी.संचालक श्री.पी.आर.शर्मा यानी मेजर ध्यानचंद त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाचा गौरव करून त्यांच्य हॉकी खेळ खेळण्याच्या जडू बदल महिती सागितली.सूत्रसंचलक जबाबदारी पार पाडली.आभार प्रदर्शन प्रा,हरीश घोडेकर यानी केले .तत्सेच महाविद्यालया मधिल प्रशांत आहाळेबाबू श्री महेश अवस्थी सर्व कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थीत होते.

## उद्या विभागीय 'डाक अदालत'चे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

टपाल विभागामार्फत ग्राहकांच्या तक्रारींचे प्रभावी व जलद निवारण करण्यासाठी विभागीय 'डाक अदालत' आयोजित करण्यात आली आहे. ही डाक अदालत उद्या दि १ सप्टेंबर रोजी सायंकाळी चार वाजता जीपीओ इमारतीतील अधीक्षक, आरएमएस 'एफ' विभाग, नागपूर यांच्या दालनात पार पडणार आहे. ज्या टपाल सेवांच्या तक्रारींचे निवारण तीन आठवड्यांच्या आत झालेले नाही, अशा तक्रारी या अदालतीमध्ये सोडविण्यात येतील. यामध्ये नोंदणीकृत व अनिबंधित टपालस्पीड पोस्ट, पार्सल, काउंटर सेवा इत्यादींशी संबंधित तक्रारींचा समावेश करण्यात येईल. तक्रारदारांनी आपल्या तक्रारीत मूळ तक्रार कोणत्या अधिकाऱ्याकडे व कोणत्या पदावर सादर केली होती.

## पोलिस बांधवांना राखी बांधून मोरया फाउंडेशनने साजरा केला रक्षाबंधनाचा सामाजिक संदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या प्रेम, विश्वास आणि आपुलकीचा सण म्हणून सर्वत्र उत्साहात साजरा केला जातो. मात्र, या सणाला सामाजिक बांधिलकीची जोड देत दरवर्षीप्रमाणे यंदाही मोरया फाउंडेशनच्या वतीने रक्षाबंधनाचा विशेष उपक्रम राबविण्यात आला. यावर्षीचा रक्षाबंधनाचा कार्यक्रम हुडकेश्वर पोलिस स्टेशन येथे आयोजित करण्यात आला. समाजाच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलिस बांधवांप्रती कृतज्ञता व्यक्त करत 'राखी विश्वासाची, बंध संरक्षणाचा' या भावनेतून हा उपक्रम उत्साहात पार पडला. यावेळी



एसीपी चंदा दंडवते यांच्या प्रमुख उपस्थितीत मोरया फाउंडेशनच्या सदस्यांनी पोलिस स्टेशनमधील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राखी बांधून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. पोलिस कर्मचारी आपल्या कुटुंबापासून दूर राहून, सण-उत्सवाच्या काळातही नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या या सेवाभावाची आणि त्यागाची जाणीव ठेवून त्यांच्याप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा उपक्रम असल्याचे फाउंडेशनच्या सदस्यांनी सांगितले.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने पोलिस बांधवांच्या मनगटावर राखी बांधताना फाउंडेशनच्या सदस्यांनी त्यांच्या कर्तव्याला आणि समाजसेवेला सलाम केला. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी दिवस- रात्र कार्यरत असलेल्या पोलिस यंत्रणेप्रती समाजात विश्वासाचे आणि आपुलकीचे नाते निर्माण व्हावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमामुळे पोलिस कर्मचारी आणि फाउंडेशनच्या सदस्यांमध्येही भावनिक व आत्मीय वातावरण निर्माण झाले. यावेळी मोरया फाउंडेशनच्या संस्थापिका सौ. रजनी अविनाश चौहान यांनी रक्षाबंधनाच्या सामाजिक महत्त्वावर प्रकाश टाकताना सांगितले की, रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नाही, तर समाजाच्या रक्षणासाठी सदैव तत्पर असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे.

पोलिस बांधव समाजाच्या सुरक्षेसाठी अहोरात्र आपले कर्तव्य बजावत असतात. त्यामुळे त्यांच्या मनगटावर राखी बांधून त्यांच्याप्रती विश्वास, सन्मान आणि कृतज्ञता व्यक्त करणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. समाजात सुरक्षितता, बंधुभाव, परस्पर विश्वास आणि सामाजिक एकोपा वाढविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. रक्षाबंधनाच्या पारंपरिक भावनेला सामाजिक जबाबदारीची जोड देऊन विविध क्षेत्रात समाजाचे संरक्षण करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याचा मोरया फाउंडेशनचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही मोरया फाउंडेशनच्या या उपक्रमाचे कौतुक केले. नागरिक आणि पोलिस यांच्यातील परस्पर विश्वास अधिक दृढ करण्यासाठी अशा सामाजिक उपक्रमांचा सकारात्मक परिणाम होतो, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या उपक्रमाला संध्या कठमुसरे, वृषाली कुबडे, माधुरी इत्तेडवार, लता डायरे, सविता तडस, नेहा मगर, गौरी डफ, पूर्वा पांगुळ, ज्योती नागपूरकर यांच्यासह मोरया फाउंडेशनच्या सदस्यांची उपस्थिती होती. रक्षाबंधनाच्या दिवशी पोलिस बांधवांना राखी बांधून त्यांच्या सेवेला मानाचा मुजरा करण्याच्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.

दैनिक सिंहवाणी वृत्त Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : मंगळवार, १ सप्टेंबर २०२६

थोडक्यात

## उमरेडमध्ये नेत्रदान जनजागृती अभियान, मृत्यूनंतरही दृष्टीदानचा संदेश घराघरांत



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

मरणोत्तर नेत्रदानाची चळवळ अधिक व्यापक व प्रभावी करण्याच्या उद्देशाने नेत्रसंपदा, उमरेड, उमरेड युथ फाउंडेशन व सक्षम-केंद्र, उमरेड यांच्या संयुक्त विद्यमाने मरणोत्तर नेत्रदान जनजागृती पंधरवडा अंतर्गत व्यापक गृहसंपर्क अभियान राबविण्यात आले. या अभियानादरम्यान साने गुरुजी ज्येष्ठ नागरिक मंडळ, विकास कॉलनी, अनूप लॉन परिसर, घटाळी रोड तसेच बालाजी नगर परिसरातील नागरिकांशी घरोघरी संपर्क साधून मरणोत्तर नेत्रदानाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. मृत्यूनंतर आपल्या डोळ्यांमुळे एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात पुन्हा प्रकाश निर्माण होऊ शकतो, हा मानवतेचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. नेत्रदानाबाबत समाजात असलेल्या गैरसमजुती दूर करून अधिकाधिक नागरिकांनी मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प करावा, यासाठी कार्यकर्त्यांनी नागरिकांना मार्गदर्शन केले. 'मृत्यूनंतर शरीर मातीचे, पण डोळे देऊ शकतात कुणाच्या आयुष्याला नवे उजेडाचे दान', या भावनेतून हे अभियान राबविण्यात आले.

या जनजागृती अभियानात डॉ. शशिकांत जयस्वाल, अनिलकुमार गोविंदानी, बंडूजी शिंदे, हेडाऊ सर, पांडे सर, राम तांबडे, अरविंद हजारे, अल्का रेवतकर, आशा मुंधडा, मनोहर तोंडे, मनिष शिंगणे, संजय जैस्वाल, प्रकाश जुमडे,दत्तात्रय तोटवार,सचिन कुहीकर, राजेश जिकार, लीना झाडे, रितेश राऊत, सुभाष गुप्ता,कंठीराम गिल्लुरकर, विलास रायपूरकर, रमाकांत कागदेलवार यांच्यासह कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाले. नेत्रदान ही केवळ सामाजिक बांधिलकी नसून मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश देण्याची अमूल्य संधी असल्याने या चळवळीत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, आणि दिनांक २ सप्टेंबर २०२६ स्थानिक नगर परिषद बुधवारी प्राथमिक शाळा येथे नेत्रदान जनजागरण रॅली चे आयोजन करण्यात आले आहे सर्व नागरिकांनी रॅलीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले आहे.

## भदंत नागार्जुन आर्य सुरई सरसाई यांच्या वाढदिवसानिमित्त रामटेकमध्ये भव्य रॅली



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

भदंत नागार्जुन आर्य सुरई सरसाई यांच्या ९२ व्या वाढदिवसानिमित्त रामटेक येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. वाढदिवसानिमित्त शहरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. यावेळी त्यांच्या अनुयायी, समाजबांधव व नागरिकांच्या सहभागातून भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीमध्ये मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. विविध घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. रॅलीच्या माध्यमातून भगवान गौतम बुद्धांचे विचार, सामाजिक समता, बंधुता, शांतता आणि मानवतेचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.

भदंत नागार्जुन आर्य सुरई सरसाई यांनी सामाजिक प्रबोधन व समाजामध्ये समता आणि बंधुभाव निर्माण करण्यासाठी केलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले. त्यांच्या ९२ वर्षांच्या जीवनप्रवासाचा गौरव करत उपस्थितांनी त्यांना दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य व निरोगी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी प्रफुलजी अंबादे, रजत गजभिये, अमित अंबादे, मनीष खोब्रागडे, प्रयास ठाकरे, रॉकी चवरे,राजू सांगोडे,यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून भदंत नागार्जुन आर्य सुरई सरसाई यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांच्या सामाजिक व प्रबोधनपर कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. कार्यक्रमात समाजातील विविध मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक, महिला तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जय भीम आणि नमो बुद्धायच्या जयघोषात रॅली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

### २ लाख २५ हजार ४८० रूपयांचा मुद्देमाल जप्त, केळवद पोलीसांची कामगिरी

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

तालुक्यातील पोलीस स्टेशन केळवद दिनांक ३०/०८/२०२६ रोजी केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखुची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि सागर खर्डे उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांच्या मार्गदर्शनात केळवद पोलीसांनी पांढुर्णा ते नागपूर रोडवर बिहाडा फाट्यावर येथे सापळा रचत कारवाई केली असता आरोपी नामे केतन संजय पाठक, वय ३० वर्ष, रा. राजु नगर वानाडोंगरी हिंगणा, जि. नागपूर हा चारचाकी कार क. एम एच-०२/वी होड-७६६७ सह मिळुन आला. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता त्याचेजवळ महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु एकुण वजन ३१.८११६ किग्रॅ किंमती २५,४८०/- रुपए, चारचाकी कार क. एम एच ०२/बी झेड-७६६७किंमती २,००,०००/- रुपए असा एकुण २,२५,४८०/- रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपी नामे केतन संजय पाठक, वय ३० वर्ष, रा. राजु नगर वानाडोंगरी हिंगणा, जि. नागपूर याचेविरूद्ध पोस्टे केळवद येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास केळवद पोलीस स्टेशनचे ठाणेदार आशिष सिंग ठाकूर व सहकारी करत आहे.

# राज्यपालांच्या हस्ते 'वनार्टी'च्या सेवादूत प्रकल्पाचा शुभारंभ

### ३६ जिल्ह्यांत ७२ सेवादूतांची नियुक्ती, वनार्टीच्या माहिती पुस्तकाचेही प्रकाशन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवगार्तील विद्यार्थी, युवक आणि नागरिकांपर्यंत शासनाच्या विविध योजना, प्रशिक्षणाच्या संधी तसेच रोजगार व स्वयंरोजगाराच्या उपक्रमांची माहिती थेट पोहोचविण्यासाठी वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी)च्या सेवादूत प्रकल्पाला राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते सोमवारी सुरुवात झाली. पुण्यातील फर्ग्यूसन महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटर सभागृहात आयोजित भटके विमुक्त दिवसाच्या राज्यस्तरीय कार्यक्रमात वनार्टीच्या माहिती पुस्तकाचेही राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी सेवादूत प्रकल्पातील मिरा मोटे व सुनिल पवार या दोन सेवादूतांना प्रातिनिधिक स्वरूपात नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री तथा वनार्टीचे अध्यक्ष अतुल सावे, आमदार निलमताई गोऱ्हे, इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासो धुळाज (भा.प्र.से.), इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या संचालक सोनाली मुळे (भा.प्र.से.), वनार्टीचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे, 'वनार्टी' प्रकल्प अधिकारी डॉ. चेतन बन्सोड यांची उपस्थिती होती. वनार्टीच्या सेवादूत प्रकल्पांतर्गत राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये एकूण ७२ सेवादूतांची नियुक्ती करण्यात येणार आहे. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवगार्तील महिला व पुरुष उमेदवारांकडून यासाठी ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत. शासनाच्या विविध योजना आणि वनार्टीच्या उपक्रमांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करणे तसेच प्रशिक्षण, कौशल्य विकास, रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधींची माहिती देणे, ही सेवादूतांची प्रमुख जबाबदारी राहणार आहे. शासकीय योजनांची माहिती अनेकदा ग्रामीण व दुर्गम भागातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेवर पोहोचत नाही. ही माहितीची दरी भरून काढण्यासाठी सेवादूत वनार्टी आणि लाभार्थी यांच्यातील प्रत्यक्ष दुवा म्हणून काम करणार आहेत. त्यामुळे योजनांची माहिती मिळविण्यापासून अर्ज प्रक्रिया आणि उपलब्ध संधींचा लाभ घेण्यापर्यंत लाभार्थ्यांना मार्गदर्शन मिळणार आहे. राज्यपालांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आलेल्या वनार्टीच्या माहिती पुस्तकात संस्थेमार्फत राबविण्यात येणारे विविध प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि विद्यार्थ्यांसाठीच्या उपक्रमांची माहिती देण्यात आली आहे. या माहिती पुस्तकामुळे विद्यार्थ्यांना व लाभार्थ्यांना संस्थेच्या विविध योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

**सेवादूतांमुळे वनार्टीचा जनसंपर्क वाढणार : अतुल सावे**

वनार्टीच्या योजना आणि उपक्रमांचा थेट लाभ गरजू विद्यार्थी व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सेवादूत प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. शासकीय योजना उपलब्ध असूनही अनेकदा माहितीअभावी पात्र लाभार्थी त्यापासून वंचित राहतात. ही दरी दूर करण्यासाठी ३६ जिल्ह्यांत नियुक्त होणारे ७२ सेवादूत योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचविण्या सोबतच गरजू लाभार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करतील, असा विश्वास राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री तथा वनार्टीचे अध्यक्ष अतुल सावे यांनी व्यक्त केला. डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करतानाच प्रत्यक्ष जनसंपर्कावरही भर देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण, प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा तसेच रोजगाराच्या उपलब्ध संधींची माहिती देऊन त्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्याचे काम सेवादूत करतील. सेवादूत हे शासनाच्या योजना आणि लाभार्थी यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून काम करतील. त्यामुळे वनार्टीच्या उपक्रमांना अधिक व्यापक लोकाभिमुखता मिळून त्यांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यास मदत होईल असेही अतुल सावे यांनी सांगितले.

## ४५ दिवस सिलेंडरसाठी, ई-पिक नोंदणीसाठी शेतकऱ्यांची फरफट!

### ग्रामीण जनतेला प्रशासनाचा ऑनलाइन तडाखा; सरपंच संघटना आक्रमक



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

शहरात सुविधा आणि ग्रामीण भागात प्रतीक्षा, अशीच काहीशी प्रशासनाची कारभाराची तऱ्हा दिसून येत आहे. घरगुती गॅस सिलेंडरसाठी ग्रामीण ग्राहकांना तब्बल ४५ दिवस वाट पाहावी लागत आहे, तर ई-पिक पाहणीच्या बदललेल्या प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांना आपल्या पिकाची नोंद करण्यासाठी सरकारी यंत्रणेच्या दारात आणि मोबाईलच्या पडद्यावर हेलपाटे मारावे लागत आहेत. ग्रामीण जनतेला सुविधा देण्याऐवजी तिचीच परीक्षा घेण्याचा हा प्रकार कशासाठी? असा सवाल भिवापूर तालुका सरपंच संघटनेने केला आहे.

शहरी भागात साधारण २५ दिवसांत सिलेंडर मिळतो, मात्र ग्रामीण ग्राहकांच्या वाट्याला ४५ दिवसांची प्रतीक्षा का? गावात राहतो म्हणून सिलेंडरसाठीही 'ग्रामीण कोटा' आणि अधिक प्रतीक्षा असा अन्याय कशासाठी? ग्रामीण ग्राहकांनाही शहराप्रमाणे नियमित आणि वेळेत सिलेंडर मिळाला पाहिजे, अशी मागणी संघटनेने केली.

**शेतकऱ्याने शेती करायची की सरकारी नोंदणी?**

ई-पिक पाहणीची प्रक्रिया पूर्वी तुलनेने सोपी होती. पोलीस पाटील व रोजगार सेवकांकडे पाहणीची जबाबदारी होती. मात्र संबंधितांनी काम करण्यास नकार दिल्यानंतर सरकारी यंत्रणेचे कामही शेतकऱ्यांच्याच माथी मारण्यात आले, असा आरोप सरपंच संघटनेने केला.

शेतात पिके उभी करण्यासाठी शेतकरी राबतो, पावसाशी झुंजतो, बाजारभावाच्या अनिश्चिततेशी दोन हात करतो आणि आता त्यावर ई-पिक नोंदणीच्या तांत्रिक प्रक्रियेचे ओझेही टाकले जात आहे. मोबाईल, इंटरनेट आणि तांत्रिक अडचणींमुळे अनेक शेतकरी त्रस्त आहेत.

शेतकऱ्याने शेती करायची की सरकारची ऑनलाइन कागदपत्रे भरत बसायची? हा प्रश्न आता प्रशासनाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

पूर्वीची सुलभ ई-पिक पाहणी प्रक्रिया तातडीने पूर्ववत करावी, शेतकऱ्यांना पुरेसा कालावधी द्यावा आणि तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, अशी मागणी संघटनेने केली. या मागण्यांसाठी तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष तथा गट ग्रामपंचायत नक्षीचे सरपंच अनिकेत वराडे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. ई-पिक पाहणीच्या मागणीचे निवेदन तालुका कृषी अधिकाऱ्यांनाही देण्यात आले.

यावेळी सरपंच रामकृष्ण झाडे, रुपेश श्रीरामे, सुनील लेकुरवाडे, किसन बोरकर, मंजुषा डोमळे आणि दिलीप दोडके उपस्थित होते.

## २ सप्टेंबर रोजी बाबा जुमदेवजी यांचा सत्कार सोहळा

### सकाळी नऊ वाजता निघणार पदयात्रा, राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांचेसह विविध मान्यवरांची उपस्थिती

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

येथील परमात्मा एक आनंदधाम येथे येत्या दिनांक २ सप्टेंबर ला व्यसनमुक्ती अभियान अंतर्गत भगवत कृपा षष्ठी च्या पूर्व प्रभात ला महानत्यागी बाबा जुमदेवजी यांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. दरम्यान महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती गौरव पुरस्कृत (महाराष्ट्र शासन) २०१३ व २०१८ व तसेच रामटेकचे ब्रँड अँबेसिडर लक्ष्मणराव मेहर (बाबूजी) यांच्या मार्गदर्शनात होणाऱ्या या सोहळ्यामध्ये विशेष सत्कारमूर्ती म्हणून राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांचे सह विविध राजकीयांची उपस्थिती राहणार आहे. तसेच खासदार श्यामकुमार बर्वे, पर्यटन मित्र चंद्रपाल चौकसे, माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी, नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन, नमो नमो मोचार्चे राष्ट्रीय अध्यक्ष विजय हटवार, भाजपचे नागपूर जिल्हा ग्रामीण उपाध्यक्ष उदयसिंग उर्फ गज्जु यादव, नगरसेवक रजत गजभिये आदी. राजकीय मंडळी यावेळी उपस्थित राहणार असल्याची माहिती मेहर बाबूजी यांनी दिली. दिनांक २ सप्टेंबर ला सकाळी नऊ वाजता दरम्यान लंबे हनुमान मंदिर ते आनंदधाम पर्यंत पदयात्रा निघणार आहे. पदयात्रा आनंदधाम येथे पोहोचल्यावर दीप प्रज्वलन, उद्घाटन व बाबांचा सत्कार कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत व चर्चासत्र तथा याचवेळी मान्यवरांचे हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. कार्यक्रमात उत्कृष्ट कल्पना, भव्य सजावट केलेल्या झाकींना आकर्षक पारितोषिक सुद्धा देण्यात येणार आहे.



## आदिवासी वसतिगृहांचे व्यवस्थापन खाजगी संस्थेला नाही; अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** शासकीय आदिवासी विद्यार्थी वसतिगृहांचे प्रशासकीय व्यवस्थापन किंवा मालमत्तेचे अधिकार कोणत्याही खाजगी संस्थेला हस्तांतरित केलेले नसून, याविषयी पसरणाऱ्या अफवांवर विद्यार्थी, पालक व नागरिकांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहन आदिवासी विकास विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. या संदर्भात प्रसिद्ध झालेल्या बातमीवर स्पष्टीकरण देताना एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे साहाय्यक प्रकल्प अधिकारी राहुल काकडे यांनी सांगितले की, दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्था यांच्यासोबत १५ ऑगस्ट २०२५ ते १५ ऑगस्ट २०२८ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता सामंजस्य करार करण्यात आला आहे. संबंधित संस्था कोणताही मोबदला न घेता स्वयंस्फूर्तीने १८ मोफत उपक्रम राबवणार असून, संस्थेला वसतिगृहांची मालमत्ता किंवा प्रशासकीय व्यवस्थापनाचे कोणतेही अधिकार हस्तांतरित करण्यात आलेले नाहीत. या उपक्रमांमध्ये उद्योजकता विकास कार्यशाळा, करिअर मार्गदर्शन शिबीर व व्याख्यान, व्यक्तिमत्त्व विकास, शैक्षणिक योजना व शिष्यवृत्तींची माहिती, विद्यार्थी विकास मेळावा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, संभाषण कौशल्य, व्यसनमुक्ती, आर्थिक साक्षरता, संविधान अभ्यास वर्ग, महापुरुष जयंतीनिमित्त कार्यक्रम, नियमित आरोग्य तपासणी आणि विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण यांचा समावेश आहे.

# 'जयंती २'मधून उलगडणार कॉलेजमधील भेदभावाची गोष्ट

### "जयंती २' चा रंजक ट्रेलर सोशल मीडियावर लाँच, 'जयंती २', ११ सप्टेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होण्यास सज्ज





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अनेक कायदे, नियम असतानाही कॉलेजमध्ये रॅगिंग, भेदभावाच्या घटना घडतात. अनेकदा अनुसूचित जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांना जातीआधारित रॅगिंग, छळ-त्रासाला तोंड द्यावे लागते. आता 'जयंती २' या चित्रपटातून कॉलेजमधील रॅगिंग, भेदभावाची गोष्ट मांडण्यात आली आहे. चित्रपटाचा ट्रेलर नुकताच सोशल मीडियावर लाँच करण्यात आला असून, या चित्रपटातून या गंभीर विषयाला वाचा फुटणार आहे. हा चित्रपट येत्या ११ सप्टेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होण्यास सज्ज झाला आहे.

चंद्रपूरसारख्या भागातून उच्च शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या पायल नावाच्या एका मुलीची गोष्ट 'जयंती २' या चित्रपटात मांडण्यात आली आहे. उच्च शिक्षण घेऊन शेती करण्याचं स्वप्न पायलनं उराशी बाळगलं आहे. मात्र, कॉलेजमध्ये आल्यावर तिला रॅगिंगला सामोरं जावं लागतं. या त्रासाला केलेल्या विरोधातून एक संघर्ष उभा राहतो. त्यात पायलचं काय होतं? तिला न्याय मिळतो का? हे चित्रपटात मांडण्यात आलं आहे. मात्र, केवळ पायलची गोष्ट मांडण्यापुरताच हा चित्रपट मर्यादित नाही, तर या निमित्ताने कॉलेज प्रशासनाचा दृष्टिकोन, शिक्षक-विद्यार्थ्यांकडून मिळणारी वागणूक असे अनेक पदर ही कथा उलगडून दाखवते. आजच्या आधुनिक काळातही होत असलेला हा भेदभाव या चित्रपटातून भाष्य करतो आणि या भेदभावाविषयी नवे प्रश्न उपस्थित करतो.

'जयंती २' या चित्रपटाची निर्मिती मेलिओरिस्ट फिल्म स्टुडिओने केली असून चित्रपटाची कथा, संवाद आणि दिग्दर्शन शैलेश बळीराम नरवाडे यांचे आहे. 'जयंती' चित्रपटाचा प्रमुख चेहरा असलेला अभिनेता ऋतुराज वानखेडे या चित्रपटात मध्यवर्ती भूमिका साकारत असून पायल जाधव, अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकर, रोहिणी हट्टंगडी, देविका दफ्तरदार, विजय निकम, राजकुमार जरांगे, मानसी सुभाष अशी दमदार कलाकारांची फौज आपल्याला या चित्रपटातून भेटीस येणार आहे. संजीवकुमार हिल्ली यांनी कॅमेरामन म्हणून काम पाहिले असून संकलन फैसल महाडिक यांचे आहे. डॉ. सुहास अंबादे , सुहास मुंडे आणि सौरभ गुरू यांनी लिहिलेल्या गीतांना ओंकारस्वररूप यांचे संगीत लाभले असून पार्श्वसंगीत मंगेश धाकडे यांचे आहे.

चित्रपटाचा ट्रेलर अत्यंत प्रभावी आहे. पायलच्या वाट्याला येणारा भेदभाव, त्यातून उभ्या राहणाऱ्या संघर्षाची झलक या ट्रेलरमधून दिसते. त्यामुळेच चित्रपटाविषयी आता उत्सुकता निर्माण झाली आहे. २०२१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'जयंती' या चित्रपटाने बरीच चर्चा घडवली होती. आता त्या पुढे जाऊन शिक्षण क्षेत्रातील भेदभाव, त्यातील राजकारणाला 'जयंती २' या चित्रपटाने हात घातला आहे. उत्तम कथानकाला कसदार अभिनेत्यांची जोड मिळाली असल्यानं या चित्रपटाला नक्कीच भरभरून प्रतिसाद मिळणार असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

थोडक्यात

## मराठी भाषा कौशल्ये विकास कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विद्यार्थ्यांच्या भाषिक अभिव्यक्तीला अधिक प्रभावी, समृद्ध आणि परिपूर्ण करण्याच्या उद्देशाने श्री निकेतन आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, नागपूर येथे मराठी विभागाद्वारे आयोजित करण्यात आलेली पाच दिवसीय मराठी भाषा कौशल्ये विकास कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद लाभला. पहिल्या दिवशी कमला नेहरू महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. विनोद राऊत यांनी संवाद कौशल्य या विषयावर मार्गदर्शन केले. भाषा ही केवळ विचारांची देवाणघेवाण करण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्वाला आकार देणारी प्रभावी शक्ती आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. दुसऱ्या दिवशी कामठी येथील समाजकार्य महाविद्यालयाचे प्रा. डॉ. राष्ट्रपाल मेश्राम यांनी शुद्धलेखन आणि मुद्रितशोधन या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मराठी भाषा शिकताना आणि तिचा व्यवहारात वापर करताना भाषेची शुद्धता जपणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तर तिसऱ्या दिवशी महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख तथा कार्यशाळेचे समन्वयक प्रा. मुरलीधर गवळी यांनी पत्रलेखन या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. पत्रलेखनाची संकल्पना, स्वरूप, प्रकार आणि पत्रलेखनातील विविध घटक यांची माहिती देत त्यांनी प्रभावी पत्रलेखनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

चौथ्या दिवशी प्रा. डॉ. वैशाली धनविजय यांनी मुलाखत लेखन या विषयावर विशेष मार्गदर्शन केले. मुलाखतीची संकल्पना, स्वरूप, प्रकार, उद्दिष्टे, तंत्र आणि पूर्वतयारी याविषयी त्यांनी सविस्तर विवेचन केले. कार्यशाळेच्या समारोपीय दिवशी प्रा. कुमुद वाडबुधे यांनी जाहिरात लेखन व व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर व्याख्यान दिले. आधुनिक स्पर्धेच्या युगात जाहिरात हे प्रभावी जनसंवादाचे महत्त्वपूर्ण माध्यम असून, कमी शब्दांत अधिक प्रभावीपणे आशय पोहोचविण्याचे कौशल्य जाहिरात लेखनासाठी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मेधा कानेटकर यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## संकल्प योगा केंद्रात रक्षाबंधनाचा उत्साह, बहिण-भावाच्या नात्याला सामाजिक बांधिलकीची जोड




**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

संकल्प संस्थेतर्फे सुरू असलेल्या संकल्प योगा केंद्रात संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष डॉ. अशोक वासलवार यांच्या नियंत्रणात आणि सचिव डॉ. सिमला गाजलावार यांच्या मार्गदर्शनात रक्षाबंधनाचा सण उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. योगाभ्यासासोबतच सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि परस्पर स्नेहाची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने योगा केंद्राचे संचालक तथा मुख्य प्रशिक्षक कुंदन सतीश खोब्रागडे यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित महिला भगिनींनी भावांना प्रेमाचे प्रतीक असलेली राखी बांधून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपस्थितांनी एकमेकांना शुभेच्छा देत स्त्री-सन्मान, परस्पर आदर आणि सामाजिक एकतेचा संदेश दिला. संकल्प योगा केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना नियमित योगाभ्यासाची सवय लागावी, शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम राहावे तसेच समाजात सकारात्मक विचारांची निर्मिती व्हावी, यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. त्याच सामाजिक भावनेतून रक्षाबंधनाचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी योगा केंद्रातील प्रशिक्षक, महिला भगिनी तसेच योगाभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामुळे योगा केंद्रात उत्साहाचे आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले होते. रक्षाबंधन हा केवळ राखी बांधण्याचा सण नसून परस्पर सन्मान, विश्वास, प्रेम आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देणारा सण आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला. या कार्यक्रमाला अनिल मुन यांनी राख्या दान केल्या तर संतोष वंगलवार यांनी योगा ग्रूप तर्फे सर्व महिलांना राखी निमित्य बुक, पेन, मोजपट्टी टेप, संतुलित आहाराची माहिती देणारी प्लेट गिफ्ट म्हणून दिली. कुंदन खोब्रागडे यांच्या संकल्पनेतील या अभिनव उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# खामल्यातला 'अनोखा बाजार' ठरला 'अनोखा'

## शेकडो चेहऱ्यांवर उमटला आनंद, वापराविना पडलेल्या वस्तूंना मिळाले नवे आयुष्य





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

घरात वर्षानुवर्षे वापराविना पडून असलेल्या वस्तू एखाद्यासाठी निरुपयोगी ठरू शकतात; मात्र त्याच वस्तू दुसऱ्या गरजू व्यक्तीसाठी मोलाच्या ठरू शकतात. सोबत पालकत्व प्रकल्पाच्या वतीने वस्तू देणारा आणि स्वीकारणारा अशा दोघांनाही सन्मान आणि समाधान मिळावे यासाठी रविवारी खामला येथील गुलमोहर सभागृहात आयोजित करण्यात आलेला 'अनोखा बाजार' एका तऱ्हेने अनोखाच ठरला. या बाजारामुळे वापराविना पडलेल्या वस्तूंना नवे आयुष्य तर मिळालेच शिवाय, शेकडो नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंदही फुलला.

गुलमोहर हॉलमध्ये भरविण्यात आलेल्या दुसऱ्या अनोखा बाजारचे उद्घाटन नरेंद्र जोग आणि आशिष कलोडे यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री सिद्धिविनायक सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष, माजी आमदार तथा माजी महापौर संदीप जोशी होते. मान्यवरांनी अनोखा बाजारची पाहणी केली व या समाजोपयोगी उपक्रमाचे कौतुक केले.

अनोखा बाजारमध्ये आलेल्या एका आजींनी स्वतःच्या घरातील सुस्थितीत असलेला सोफा आणून दिला. विशेष म्हणजे, आर्थिकदृष्ट्या सामान्य परिस्थिती असतानाही केवळ इतरांच्या उपयोगी पडावा, या भावनेतून त्यांनी हा सोफा दान केला. त्यांच्या या कृतीने उपस्थितांची मने जिंकली.

एका चिमुकलीला बार्बी मिळाली, तर दुसऱ्या मुलीला खेळण्यातील सुंदर घर मिळाले. ते घर हातात घेतल्यानंतर तिचा आनंद गगनात मावेनासा झाला. एका घरमालकाने रोज खाली झोपत असलेल्या वॉचमनसाठी अनोखा बाजारमधून पलंग नेला. अशा अनेक छोट्या-छोट्या घटनांनी अनोखा बाजार अधिकच अर्थपूर्ण ठरला.

आपल्याकडे अतिरिक्त असलेली वस्तू समाजातील इतर व्यक्तीच्या उपयोगी पडू शकते, या विचारातून हा उपक्रम आकाराला आला आहे. त्यामुळे वस्तू देणारा आणि स्वीकारणारा या दोघांनाही या उपक्रमातून समाधान मिळत आहे.

### दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी 'अनोखा बाजार'

अनोखा बाजार हा उपक्रम दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी सायंकाळी ४ ते रात्री ८ या वेळेत शहराच्या विविध भागात भरविण्यात येतो. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी सुरुवातीला १०० रुपये सेवा शुल्क भरून नोंदणी करावी लागते व त्यानंतर बाजारातून एका वेळी कोणत्याही दोन वेगवेगळ्या वस्तू निःशुल्क घेता येतात.

या बाजारात ठेवण्यासाठी वापरण्यायोग्य वस्तू दान करू इच्छिणाऱ्या नागरिकांनी त्या पंचायतन अपार्टमेंट, प्लॉट क्र. १७६, फ्लॅट क्र. १०४, आरपीटीएस रोड, लक्ष्मीनगर, नागपूर येथे जमा कराव्यात. वस्तू स्वीकारण्यासाठी दर रविवारी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत कलेक्शन सेंटर सुरू राहणार आहे.

## दीनदयाल शोध संस्थान, चित्रकूटला पुराचा फटका : पुनरुज्जीवनासाठी बालजगतची १२ लाखांची मदत



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मध्य प्रदेशातील चित्रकूट आणि सतना जिल्ह्यात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे मंदाकिनी नदीला आलेल्या महापुराने नदीकाठच्या परिसरात गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. भारतरत्न नानाजी देशमुख यांनी उभारलेल्या चित्रकूट येथील दीनदयाल शोध संस्थानच्या आरोग्यधाम, पंचवटी, दंत चिकित्सालय, नानाजी देशमुख यांचे वास्तव असलेले सियाराम कुटीर, कृष्णादेवी वनवासी बालिका विद्यालय, कृषी विज्ञान केंद्र आदी संपूर्ण परिसराला पुराचा फटका बसला असून, हा परिसर पाण्याखाली गेला आहे. या पुरामुळे संस्थानची सुमारे साडेतीन कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती आहे.

या बिकट परिस्थितीत बाधित परिसराच्या पुनरुज्जीवनासाठी नागपूरच्या बालजगत, दीनदयाल शोध संस्थान, लक्ष्मीनगर यांनी पुढाकार घेत ५ लाख रुपयांची मदत पाठविली आहे. तसेच ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. आनंद परचुरे यांनी १ लाख रुपये, दीनदयाल शोध संस्थानचे प्रधान सचिव निखिल मुंडले यांनी २ लाख रुपये आणि उपाध्यक्ष पंकज महाजन यांनी १ लाख रुपयांचा मदत निधी दिला आहे. सेंटर फॉर भारतीय मासेस अँड डेव्हलपमेंट एंटरप्राइजेसच्या माध्यमातूनही ५ लाख रुपयांची मदत पाठविण्यात आली आहे. विविध स्तरांतून मिळालेल्या मदतीतून आतापर्यंत १२ लाख रुपयांचा निधी पूरग्रस्त भागासाठी पाठविण्यात आला आहे.

बालजगतचे अध्यक्ष अभिनंदन पळसापुरे यांनी दीनदयाल शोध संस्थानचे प्रधान सचिव निखिल मुंडले यांना हा १२ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. याप्रसंगी प्रकल्प प्रमुख अनुजा परचुरे, उपाध्यक्ष पंकज महाजन, सचिव संजय भाकरे यांच्यासह बालजगत परिवारातील सदस्य उपस्थित होते. चित्रकूटमधील पूरस्थिती अत्यंत गंभीर असून, बाधित परिसराच्या पुनरुज्जीवनासाठी मोठ्या प्रमाणावर मदतीची आवश्यकता आहे. त्यामुळे समाजातील नागरिक, संस्था आणि दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन मदतीचा हात द्यावा, असे आवाहन अभिनंदन पळसापुरे यांनी केले.

## पोषण आहार, मातृ वंदना योजनाबाबत सविस्तर चर्चा

### महिला व बालकल्याण विशेष समितीची बैठक



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विशेष समितीची बैठक समिती सभापती सारिका नांदुरकर यांच्या अध्यक्षतेत सोमवार (ता.३१) रोजी दुपारी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृह येथे पार पडली. यावेळी शहरातील विविध अंगणवाडी केंद्रांतील सुविधा व अडचणी, महिला समुपदेशन कार्यशाळा, शिवणयंत्र वाटप योजना, अभ्यास दौरा, महिला उद्योजिका मेळावा यांसह विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत उपसभापती तारा (लक्ष्मी) यादव, समिती सदस्य चेतना निमजे, समिती सदस्य माहेश्वरी बिसेन, समिती सदस्य कल्पना द्रोणकर,समिती सदस्य कुमारी लक्ष्मी हत्तीठेले, समिती सदस्य तासणीम परवीन नियामत खान ताजी, समिती सदस्य शिला तराळे, मनपाच्या उपायुक्त डॉ. रंजना लाडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी दीपक सेलोकर, बालविकास प्रकल्प अधिकारी (दक्षिण) रणजित कुऱ्हे, बालविकास प्रकल्प अधिकारी (उत्तर) रूपा मोहितकर, बालविकास प्रकल्प अधिकारी (पश्चिम) भारती मानकर, बालविकास प्रकल्प अधिकारी (पूर्व) अपर्णा कोल्हे, उपशिक्षण अधिकारी सीमा खोब्रागडे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत समिती सभापतींद्वारे शहरातील अंगणवाडी केंद्रची सद्यस्थिती, उपलब्ध सुविधा आणि अडचणींचा आढावा घेण्यात आला. यावेळी बालविकास प्रकल्प अधिकारी (दक्षिण) श्री. रणजित कुऱ्हे यांनी शहरातील विविध भागातील अंगणवाडींची माहिती दिली. तसेच महानगरपालिकेद्वारे वापरात नसलेल्या इमारतींना अंगणवाडीच्या कामासाठी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. यावेळी सदस्यांनी महिला समुपदेशन कार्यशाळा संदर्भात चर्चा करण्यात आली. या कार्यशाळेच्या माध्यमातून महिलांना कायदेविषयक आणि सुरक्षाविषयक माहिती व जागृती करण्यासह कौटुंबिक समस्यांचे समजूतीने निराकरण करण्यास मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. गरजू महिलांना आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करता यावी यासाठी मनपातर्फे शिवणयंत्र वाटप योजनेवर अंमल करण्यासाठी दिलेल्या सूचनांचा आढावा घेण्यात आला यावेळी, लवकरच वाटप करता येणार असून गरजूंना देण्यात येईल अशी माहिती मिळाली. संबंधित योजनेतील शासकीय, निमशासकीय अथवा इतर संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र आवश्यक या नियमाला शिथिल करून अनुभव प्रमाणपत्रांना समाविष्ट करण्यात यावे अशी सूचना करण्यात आली.

## गुरूवार ३ सप्टेंबर रोजी मनपाची शाडू मातीच्या गणेशमूर्ती कार्यशाळा

### गणेश मंडप परवानगीसाठी ऑनलाइन सुविधा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुलांमध्ये श्री गणेशाविषयी आदरभाव निर्माण करण्यासोबतच पर्यावरण संवर्धनाची जाणीव रुजविण्याच्या उद्देशाने गुरूवार ३ सप्टेंबर २०२६ रोजी शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ही कार्यशाळा रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट्ट सभागृह येथे सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत होणार आहे.

महापौर निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, आयुक्त डॉ. विपीन यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम पूर्णतः निःशुल्क असून,विद्यार्थ्यांना स्वतःच्या हाताने शाडू मातीची पर्यावरणपूरक श्री गणेशमूर्ती घडविण्याचा अनुभव मिळणार आहे.

सहभागी होण्यासाठी https://nagpur-green-kids.emergent.host या लिंकवर नोंदणी करावी. तसेच प्रत्येक गणेश मंडळातील एका प्रतिनिधीने या कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**गणेश मंडप परवानगीसाठी ऑनलाइन सुविधा**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश मंडप परवानगी प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी ऑनलाइन पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले आहे. या पोर्टलच्या वापराबाबत येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे झोननिहाय नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# पर्यावरणपूरक, सुरक्षित व ऊर्जावान गणेशोत्सव साजरा करण्याचे महावितरणचे सार्वजनिक गणेश मंडळांना आवाहन





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

संपूर्ण महाराष्ट्राचे श्रद्धास्थान असलेल्या लाडक्या गणपती बाप्पाच्या आगमनाची तयारी आता राज्यभरात अतिशय उत्साहात सुरू झाली आहे. गणेशोत्सवाचा हा आनंद अधिक द्विगुणित करतानाच सार्वजनिक सुरक्षेला सर्वोपरि प्राधान्य देण्याचे आणि पर्यावरणाचा समतोल राखण्याचे आवाहन महावितरणतर्फे सार्वजनिक गणेश मंडळांना करण्यात आले आहे. यंदाचा गणेशोत्सव हा सुरक्षित, प्रकाशमय, ऊर्जा बचत करणारा आणि पर्यावरणपूरक असावा, यासाठी महावितरणने काही मोलाच्या सूचना दिल्या आहेत.

**सुरक्षिततेला प्राधान्य आणि परवानाधारक ठेकेदारांची मदत:** गणेशोत्सवाच्या काळात सजावट, रोषणाई आणि साऊंड सिस्टीमसाठी मोठ्या प्रमाणावर विजेचा वापर केला जातो. कोणतीही दुर्दैवी दुर्घटना किंवा शॉर्ट सर्किटसारखे अपघात टाळण्यासाठी केवळ प्रमाणित आणि कुशल विजेच्या ठेकेदारांकडूनच वीज जोडणीचे व वायरिंगचे काम करून घेणे बंधनकारक व अत्यंत आवश्यक आहे. घाईगडबडीत किंवा अननुभवी व्यक्तींकडून काम करून घेतल्यास जीविताची व मालमत्तेची हानी होऊ शकते, त्यामुळे सुरक्षेच्या नियमांशी तडजोड न करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

**अत्यंत सुलभ आणि ऑनलाईन तात्पुरती वीज जोडणी:** गणेश मंडळांना अधिकृत वीज जोडणी मिळवणे सुलभ व्हावे, यासाठी महावितरणने अर्ज प्रक्रिया अत्यंत सोपी केली आहे. आता कोणत्याही मंडळाला लांबच लांब रांगा लावण्याची गरज नसून, महावितरणच्या अधिकृत मोबाईल ॲप किंवा ऑनलाईन संकेतस्थळावरून सहज अर्ज करता येणार आहे. या डिजिटल सुविधेमुळे मंडळांना अल्पावधीत आणि त्वरित तात्पुरती वीज जोडणी मिळणे सुलभ झाले आहे. त्यामुळे सर्व गणेश मंडळांनी अनधिकृत वीज जोडणीचा मार्ग टाळून केवळ अधिकृत वीज जोडणीचाच वापर करावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

**अनधिकृत वीज वापर टाळा आणि मंडप उभारणीत खबरदारी घ्या:** सार्वजनिक सुरक्षेचा सखोल विचार करता कोणत्याही मंडळाने अनधिकृतपणे किंवा हूक टाकून विजेचा वापर करू नये, असा इशारा महावितरणने दिला आहे. तसेच, गणेशोत्सवासाठी मंडप उभारताना विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. विजेच्या मुख्य तारा, रोहित्रे किंवा खांबांजवळ मंडप उभारणे किंवा कमानी तयार करणे टाळावे. तारा व मंडपाची रोषणाई यामध्ये सुरक्षित अंतर राखल्यास कोणत्याही प्रकारच्या संभाव्य अपघातांना प्रभावीपणे टाळता येऊ शकते.

**ऊर्जा बचतीसाठी एलईडी दिव्यांचा अधिकाधिक वापर:** वीज बिलाचा भार कमी करण्यासाठी आणि आकर्षक रोषणाई करण्यासाठी पारंपरिक आणि जास्त वीज खाणाऱ्या दिव्यांऐवजी ऊर्जा वाचवणाऱ्या अत्याधुनिक एलईडी दिव्यांचा वापर करावा. एलईडी दिव्यांमुळे केवळ विजेची मोठी बचत होत नाही, तर रोषणाई देखील अधिक देखणी आणि सुंदर दिसते.

**सौर ऊर्जेचा वापर करून पर्यावरण रक्षणाचा आदर्श :** आजच्या काळात ऊर्जेची बचत करणे आणि पारंपरिक ऊर्जा स्रोतांवरील ताण कमी करणे ही काळाची गरज बनली आहे. त्यामुळे शक्य त्या प्रत्येक गणेश मंडळाने आपल्या मंडपात किंवा उपक्रमांमध्ये सौर ऊर्जेचा वापर करून पर्यावरण रक्षणाचा एक नवा आणि प्रेरणादायी आदर्श निर्माण करावा.

**ऊर्जा बचत व पर्यावरणपूरक जनजागृती:** केवळ वीज वापरण्यापुरता हा विषय मर्यादित न ठेवता, गणेशोत्सवाच्या माध्यमातून हजारो भाविकांपर्यंत संदेश पोहोचवता येऊ शकतो. ऊर्जा बचत, सौर ऊर्जा आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवा बाबत फलक, डिजिटल बॅनर्स व विविध उपक्रमांच्या माध्यमातून व्यापक जनमानसात जनजागृती निर्माण करावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

गणपती बाप्पाच्या स्वागताचा आनंदोत्सव साजरा करताना सुरक्षेच्या सर्व नियमांचे तंतोतंत पालन करून यंदाचा गणेशोत्सव अधिक अर्थपूर्ण, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक पार पाडण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.